सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

दूरध्वनी क्र. ०२२-२६८३३०५४
Email :
dcpdetection1.mum@mahapolice.gov.in

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग
**पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१)**
गुन्हे शाखा, गुन्हे अन्वेषण विभाग,
अंधेरी पोलीस ठाणे आवार, अंधेरी (पुर्व),
मुंबई - ४०० ०६९ यांचे कार्यालय

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउआ/प्र-१/Press note/ ०४/२०२३ दिनांक : ०२/०२/२०२३

# प्रेस नोट

## अल्पवयीन मुलीकडून देह विक्रीचा व्यवसाय करणाऱ्या आरोपीताना जेरबंद करण्यात कक्ष-१० गुन्हे शाखेस यश.

| | |
|---|---|
| कक्ष | कक्ष-१०, गुप्रशा, गुअवि., मुंबई. |
| पोलीस ठाणे | मालवणी पोलीस ठाणे, मुंबई. |
| गु.र.क्र. व कलम | गु.र.क्र. १५१/२०२३ कलम ३६६(अ), ३७०(अ)(३), ३७२, ३७६, ३४ भादंविसं. सह ४, ५ स्त्रीया व मुलींचा अनैतिक व्यापार प्रति. अधिनियम १९५६ सह पोस्को कलम ४,८,१२,१७, १८. |
| दाखल दिनांक | दि. ०२/०२/२०२३ |
| गुन्हा घडला दिनांक वेळ व ठिकाण | दि.०१/०२/२०२३ रोजी २३.३० वाजता., ठिकाण - रूम नं. ४, १ ला मजला, खानदेश चाळ, ब्लॉक नं. ३, खारोडी पोस्ट ऑफीसच्या पाठीमागे, मालवणी मालाड पश्चिम, मुंबई ४०० ०९५. |
| फिर्यादीचे नाव | श्री. तातोबा मायाप्पा खरात, पोहक्र. ९७०४७६/कक्ष-१० गुप्रशा, मुंबई |
| आरोपींची संख्या | एकूण २ आरोपी |

**हकिगत :-**मालवणी पोलीस ठाणेच्या हद्दीत दोन इसम स्वंत:च्या आर्थिक फायद्याकरीता वेश्यागमनाकरीता मुली व स्त्रिया पुरवून वर नमूद ठिकाणी कुंटणखाना चालवूना बेकायदेशिरपणे वेश्या व्यवसाय करतात अशी विश्वसनीय माहिती कक्ष-१० गु.प्र.शा., गु.अ.वि. , मुंबई येथील सपोनि. धनराज चौधरी यांना मिळाली होती. सपोनि. धनराज चौधरी, यांनी सदर माहिती कक्ष-१० गु.प्र.शा. येथील प्रभारी पोलीस निरीक्षक दिपक सावंत यांना अवगत करून त्यांच्या तसेच मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाची नियुक्ती करून नियोजनबध्द छापा कारवाईची योजना आखली.

दिनांक ०१/०२/२०२३ रोजी कक्ष-१० गुप्रशा येथील पोलीस पथकाने मालवणी पोलीस ठाणे, मुंबई च्या हद्दीतील रूम नं. ४, १ ला मजला, खानदेश चाळ, ब्लॉक नं. ३, खारोडी पोस्ट ऑफीसच्या पाठीमागे, मालवणी मालाड पश्चिम, मुंबई ९५, येथे बोगस गिऱ्हाईक पाठविले आणि दोन पंचांसह छापा टाकला असता तेथे दोन इसम आणि एक अल्पवयीन मुलगी मिळून आली. अधिक चौकशीत आढळून आले की, दोन इसम हे गिऱ्हाईकांना वेश्यागमनासाठी आकर्षित करीत असतात व त्याकरीता गरजू अल्पवयीन मुलींना वेश्याव्यवसायाकरीता प्रवृत्त करून देह विक्री करण्याकरीता सुरीया, हाबरा, नॉर्थ २४ परगना, पश्चिम बंगाल येथुन आणुन पुरवित असल्याचे निदर्शनास आले. सदरठिकाणी दिसत्या परिस्थितीचा पंचनामा करून देह विक्री करण्याकरीता प्रवृत्त करणारे खालील नमूद दोन इसम तसेच १५ वर्षे ०६ महिने वयाच्या अल्पवयीन बळीत मुलीला ताब्यात घेतले.

**ताब्यात घेतलेले इसम** :-

१)चंदन लालतू शेख, वय २९ वर्षे, धंदा - वेश्या दलाल, राहणार- रूम नं. ४ १ ला मजला, खानदेश चाळ, ब्लॉक नं. ३, खारोडी पोस्ट ऑफीसच्या पाठीमागे, मालवणी मालाड पश्चिम, मुंबई ४०० ०९५.

२) अबिर साफियर मिध्ये, वय १८ वर्षे, राहणार- रूम नं. ४ १ ला मजला, खानदेश चाळ, ब्लॉक नं. ३, खारोडी पोस्ट ऑफीसच्या पाठीमागे, मालवणी मालाड पश्चिम, मुंबई ४०० ०९५.

ताब्यात घेण्यात आलेल्या दोन इसमांकडून मोबाईल फोन आणि रोख रू. ३०००/- तपासकामी हस्तगत केले. सदर आरोपी बकायदेशिरपणे देह विक्रीचा व्यवसाय करण्याकरीता गरजू अल्पवयीन मुलींना व महिलांना देह विक्रीस प्रवृत्त करून ग्राहकांकडून बळीत अल्पवयीन मुलीला मिळणाऱ्या रकमेतून स्वत:चा आर्थिक फायदा करून घेतात असे निदर्शनास आल्यावरून आरोपीच्या विरोधात मालवणी पोलीस ठाणे येथे दि. ०२/०२/२०२३ रोजी वर नमुद प्रमाणे गुन्हा नोंद करून वर नमुद दोन आरोपीतांना अटक केले व अल्पवयीन मुलीला ताब्यात घेतलेल्या मुद्देमालासह पुढील कायदेशिर कारवाईकरीता मालवणी पोलीस ठाणे यांच्या ताब्यात दिले.

सदरची यशस्वी कारवाई मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे) श्री. लखमी गौतम, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण-१), श्री. कृष्ण कान्त उपाध्याय, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (डि-पश्चिम) श्री. दिपक निकम यांचे मार्गदर्शनाखाली, कक्ष-१० गुप्रशा, मरोळ मुंबई येथील प्रभारी पोलीस निरीक्षक श्री. दिपक सावंत, पोलीस निरीक्षक उत्तम भजनावळे, सहाय्यक पोलीस निरिक्षक श्री धनराज चौधरी, सहाय्यक पोलीस निरिक्षक श्री. गणेश तोडकर, पोलीस अंमलदार पो.ह. जगदीश धारगळकर, पो.ह तातोबा खरात, पोशि स्वप्निल खेडेकर, मपोशि दया खाडे, पोशि प्रकाश चव्हाण यांनी पार पाडली आहे.

**** D 1/04/2023****